# प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर जि. जळगाव

## शै.वर्ष -२०२४ -२०२५

## राष्ट्रीय सेवा योजना

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर

## अहवाल

## दि. २१ जानेवारी २०२५ ते २७ जानेवारी २०२५

चिमणपुरी पिंपळे ता. अमळनेर, जि. जळगाव

**कार्यक्रम अधिकारी**
**प्रा डॉ हेमंत. जी. पवार**

**प्राचार्य,**
**प्रा. डॉ .ए. बी. जैन**

**प्रताप महाविद्यालय, अमळनेर (स्वायत्त) विशेष राष्ट्रीय सेवा योजना शिबिर अहवाल कालावधी : २१ ते २७ जानेवारी २०२५ स्थळ : चिमणपुरी  पिंपळे, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव संकल्पना : "Youth for My Bharat" व "Digital Literacy"**

**प्रस्तावना** : राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दरवर्षी आयोजित होणारे विशेष शिबिर हे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, शिस्त, सेवा वृत्ती व राष्ट्रीय मूल्यांची जोपासना करण्याचे कार्य करते. सन २०२५ मध्ये प्रताप महाविद्यालय, अमळनेर आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हे विशेष शिबिर, चिमणपुरी पिंपळे गावामध्ये "Youth for My Bharat" व "Digital Literacy" या दोन संकल्पनांवर आधारित, २१ ते २७ जानेवारी २०२५ दरम्यान यशस्वीरित्या पार पडले.

पहिला दिवस – **२१ जानेवारी २०२५** : उद्घाटन समारंभ शिबिराच्या उद्घाटन समारंभास प्राचार्य डॉ. ए. बी. जैन, निम्बा दाला चौधरी (अध्यक्ष, दत्त मंदिर ट्रस्ट), डॉ. एस. बी. नेरकर (सिनेट सदस्य), प्रा. भाग्यश्री जाधव व डॉ. हेमंत पवार (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) प्रमुख उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी युवाशक्तीच्या राष्ट्रनिर्माणातील भूमिकेवर प्रकाश टाकला आणि ग्रामीण विकासात डिजिटल साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले.


प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर
राष्ट्रीय सेवा योजना
"NOT ME, BUT YOU"
युथ फॉर माय भारत/युथ फॉर डिजीटल लिटरसी

दुसरा दिवस – **२२ जानेवारी २०२५** : श्रमदान व स्वच्छता मोहीम स्वयंसेवकांनी गावातील मंदिरे, शाळा, अंगणवाड्या व सार्वजनिक जागांमध्ये श्रमदानाद्वारे स्वच्छता मोहीम राबवली. या उपक्रमामुळे गावात स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली आणि सामाजिक बांधिलकीची भावना दृढ झाली.



तिसरा दिवस – **२३ जानेवारी २०२५** : मधुमेह तपासणी शिबिर Lions Club of Amalner च्या सहकार्याने मोफत मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. मिलिंद नवसरीकर व डॉ. विक्रांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी करण्यात आली. या उपक्रमाद्वारे आरोग्य जनजागृतीसोबतच डिजिटल आरोग्य सेवांचा उपयोग करण्यास प्रवृत्त करण्यात आले. तसेच गावाजवळील टेकडीवर वृक्षारोपणसाठी खड्डे खोदण्यात आले.




चौथा दिवस – **२४ जानेवारी २०२५** : वृक्षारोपण तयारी व श्रमदान पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने स्वयंसेवकांनी वृक्षारोपणपूर्व तयारी केली. यामध्ये खड्डे खोदणे, माती भरणे व लागवडीसाठी योग्य जागा निश्चित करणे यांचा समावेश होता. यावेळी डॉ. विजय टून्ते  व डॉ. सतीश चौधरी यांनी पर्यावरणीय शाश्वतता आणि संरक्षणासाठी डिजिटल साधनांच्या उपयुक्ततेवर मार्गदर्शन केले.



पाचवा दिवस – **२५ जानेवारी २०२५** : राष्ट्रीय मतदार दिवस व जनजागृती रॅली राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. स्वयंसेवकांनी घोषणा देत गावातून जनजागृती केली. रस्तानाट्याद्वारे लोकशाहीतील मतदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. डॉ. एस. बी. नेरकर यांच्या प्रभावी मार्गदर्शनाने नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्याचे महत्व पटवून देण्यात आले. त्यानंतर स्वयंसेवकांनी 'My Bharat' पोर्टलवर ग्रामस्थांची नोंदणी करून डिजिटल सेवा वापरण्यास प्रोत्साहित केले.




सांस्कृतिक कार्यक्रम व डिजिटल साक्षरता उपक्रम : सायंकाळी पारंपरिक लोकनृत्य, देशभक्तिपर गीत व नाट्य सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमातून देशप्रेमाचे भाव वृद्धिंगत झाले. याशिवाय डिजिटल इंडिया उपक्रमाअंतर्गत स्वयंसेवकांनी ऑनलाईन पोर्टल नोंदणी व डिजिटल सेवांची माहिती ग्रामस्थांना दिली.

सहावा दिवस – **२६ जानेवारी २०२५** : प्रजासत्ताक दिन व श्रमदान उपक्रम प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहणानंतर स्वयंसेवकांनी गावात रॅली काढून देशभक्तीपर घोषणा दिल्या. स्त्री भ्रूणहत्या

प्रतिबंधात्मक जनजागृतीसाठी प्रभावी रस्तानाट्य सादर करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता व सजावट करण्यात आली.




सातवा दिवस – **२७ जानेवारी २०२५** : समारोप समारंभ शिबिराचा समारोप प्राचार्य डॉ. ए. बी. जैन, निम्बा दाला चौधरी, डॉ. एस. बी. नेरकर व सीए नीरजभाऊ अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. पाहुण्यांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. प्राचार्य डॉ. जैन यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या समाजोपयोगी कार्यावर प्रकाश टाकत स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. शिबिराचे संपूर्ण आयोजन

संचालक डॉ. सचिन नांद्रे व कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे पार पडले.

